# वसई विरार शहर महानगरपालिका

## वैद्यकीय आरोग्य विभाग

## प्रेस नोट

---

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नालासोपारा (पू.), वसई (पू.) आणि विरार (पू.) परिसरात अवैध वैद्यकीय व्यवसायिक प्रॅक्टीस करीत असलेलेबाबत तोंडी माहिती प्राप्त झाल्याने तसेच अशा अवैध वैद्यकीय व्यवसायीकांपासून नागरीकांच्या जीवितास हानी पोहण्याची शक्यता असल्याने अशा अवैध वैद्यकीय व्यवसायिकांना शोधून त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणे गरजेचे होते. याअनुषंगाने मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य) व डॉ. भक्ती चौधरी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकीय आरोग्य विभागातंर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना धाडसत्र घेऊन दोषी आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

सदर सुचनेनुसार दिनांक ०९/०२/२०२५ रोजी धाडसत्रातंर्गत १ अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर संबंधित पोलीस ठाणे येथे प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल करण्यात आली. अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या इसमांची माहिती पुढील प्रमाणे:-

१. सुनिल कुमार हिरालाल यादव, हरवटे पाडा, संजय बिहारी धानीवबाग, नालासोपारा (पूर्व)

२. पुष्पा यादव, हरवटे पाडा, संजय बिहारी धानीवबाग, नालासोपारा (पूर्व)

अशा अवैध वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्यासाठी सदरचे धाडसत्र असेच सुरु राहणार असून वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र 'बोगस डॉक्टर मुक्त' करण्याचे आवाहन स्वीकारुन महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य विभाग कार्यरत राहणार असून नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांपासून सावध रहा. तसेच असे इसम आपल्या कार्यक्षेत्रात असल्यास याबाबत वैद्यकीय आरोग्य विभाग, सातवा मजला, मुख्य कार्यालय, विरार पश्चिम येथे माहिती देण्यात यावी. आपण दिलेल्या माहितीबाबत गोपनीयता ठेवण्यात येईल.